R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ११९ गुरूवार दि.२० नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## महाराष्ट्रातील निवडणुकीवर टांगती तलवार



नवी दिल्ली : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ५० टक्के आरक्षण मर्यादा वादावरुन टांगती तलवार कायम आहे. आरक्षणाच्या अंमलबजावणीत काही ठिकाणी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचा आरोप करत दाखल याचिकेवर आज सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. मात्र, काही मुद्यांवर अधिक स्पष्टता आवश्यक असल्यामुळे ही सुनावणी आता मंगळवारपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. या कालावधीत कोणत्याही नव्या निवडणुकांची घोषणा होणार नाही.

राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणा–या या निवडणुका मिनी विधानसभा मानल्या जातात. त्यामुळे आरक्षणाचा वाद आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय याकडे सर्व राजकीय पक्षांचे लक्ष लागून आहे.

सुनावणीत काय घडले?

– स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांशी संबंधित याचिकांची सुनावणी आता पुढील मंगळवारी होणार.

– न्यायालयाने स्पष्ट केले की, ही बाब निवडणूक प्रक्रियेशी थेट संबंधित आहे, त्यामुळे सर्व तथ्ये समोर ठेवून निर्णय घ्यावा लागेल.

– ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण लागू केल्याचा आरोप अद्याप प्रलंबित असून कोर्ट या मुद्याकडे गांभीर्याने पाहत आहे.

– राज्य सरकारने कोर्टाला सांगितले की, महापालिका निवडणुकांची घोषणा अद्याप झालेली नाही, कारण आरक्षण निकष आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.

कोर्टाचा कडक इशारा

– या प्रकरणात १७ नोव्हेंबरला झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने राज्य सरकारच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली होती.

– ५० % आरक्षण मर्यादा ओलांडू नका, नाहीतर निवडणुकाच रोखू हा न्यायालयाचा स्पष्ट इशारा.

– बांठिया आयोगाची वैधता नंतर तपासू, पण सद्यस्थितीनुसार निवडणूक प्रक्रिया चालली पाहिजे, असे त्या वेळी कोर्टाने म्हटले होते.

– केंद्र सरकारचे कायदेशीर प्रतिनिधी तुषार मेहता यांनी अधिक वेळ मागितला होता त्या संदर्भातही कोर्टाने नाराजी दर्शवली होती.

काय आहे नेमका वाद?

विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. राज्य सरकारचा दावा मात्र असा की, बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे.

निवडणुका वेळापत्रकानुसार सुरू

आरक्षण वाद असूनही २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक वेळापत्रक सुरूच आहे.

१९ ते २१ नोव्हेंबर: अर्ज मागे घेण्याची मुदत

२६ नोव्हेंबर: अंतिम उमेदवार यादी

२ डिसेंबर: मतदान

३ डिसेंबर: निकाल

## प्रतिबंधित गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल – ९५,०६० / रुपयांचा मुद्देमाल जप्त.



लातूर:– प्रतिबंधित गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल – ९५,०६० / रुपयांचा मुद्देमाल जप्त.

लातूर पोलिस अधीक्षकांच्या विशेष पथकाची एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत कारवाई.

लातूर शहरामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व पानमसाल्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर लातूर पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने कारवाई केली असून, या कारवाईत एकूण ९५,०६० रु .किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्यासंदर्भात पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी अवैध धंदे, विशेषतः प्रतिबंधित वस्तूंची विक्री, यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. आयुब शेख यांच्या नेतृत्वाखालील पथकाला दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी गोपनीय माहिती प्राप्त झाली की, एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील संविधान चौकात सागर पान मटेरियल दुकानात प्रतिबंधित गुटखा व पानमसाल्याची अवैध विक्री सुरू आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ कारवाई करत छापेमारी केली असता, माधव गंगाधर ताकबिडे (रा. विक्रम नगर, लातूर) हा व्यक्ती महाराष्ट्र शासनाने विक्री, व्यवसाय आणि सेवनासाठी बंदी घातलेल्या विविध कंपनींचा गुटखा व पानमसाला साठवून ठेवून विक्री करत असल्याचे आढळले.

या कारवाईत एकूण ९५,०६०/– किमतीचा गुटखा व पानमसाल्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीस त्वरित अटक करून त्याच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाणे, लातूर येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विशेष पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. आयुब शेख यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक उत्तम जाधव युसुफ शेख, रामहरी भोसले,विशाल गुंडरे,यशवंत घुगे, चामे यांनी केली आहे.

## अटी-शर्तीचा भंग : रामेगाव पाटी येथील अंबिका कला केंद्रावर गुन्हा दाखल




लातूर :– रामेगाव पाटी (ता. लातूर) येथील अंबिका कला केंद्रास प्रशासनाने विशिष्ट अटी–शर्तींच्या अधीन राहून परवाना दिला होता. मात्र या ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याची माहिती मिळताच तहसीलदारांच्या उपस्थितीत पोलिसांनी छापा टाकून केंद्र संचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बार्शी रोडवरील या अंबिका कला केंद्राचे संचालन कैलास सिद्धेश्वर गुरव (रा. येडशी) हे करीत होते. संबंधित केंद्रात परवानगीतील अटींचे पालन न करता नृत्य सादरीकरण सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली. त्यानंतर तहसीलदार सौदागर तांदळे व नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी पथकासह पाहणी केली. पाहणीवेळी केंद्रात बी–१, बी–२, बी–४, बी–७, बी–८, बी–९ अशा क्रमांकाच्या खोल्यांत नृत्यांगना ग्राहकांसमोर नृत्य सादर करत असल्याचे दिसून आले. नियमांनुसार पारंपरिक वाद्ये–ढोलकी, तबला, स्वरपेटी, घुंगरू, गायिका–या उपस्थितीतच नृत्य सादर करणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात कोणतेही वाद्य न वापरता उच्च आवाजातील साऊंड सिस्टिमवर नृत्य सुरू असल्याचे स्पष्ट झाले. ही परिस्थिती परवानगीतील अटी–शर्तींचा स्पष्ट भंग असल्याने तहसीलदारांनी त्वरित गातेगाव पोलिसांना बोलावले. पोलिसांनी स्थळी पंचनामा करून कला केंद्राची संपूर्ण पाहणी केली. त्यानंतर कला केंद्र चालक कैलास गुरव यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. या प्रकरणाची पुढील तपासाची जबाबदारी गातेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाकडे देण्यात आली आहे. प्रशासनाने अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्या केंद्रांवर कठोर कारवाई सुरूच ठेवण्याचा इशाराही दिला आहे.

## जिल्हा जात पडताळणी कार्यालयाचे उपयुक्त तथा सदस्य बलभीम शिंदे यांना 'दैनिक महावृत्त' पुस्तक भेट




लातूर /प्रतिनिधी :– जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती , लातूर येथील नूतन उपयुक्त तथा सदस्य बलभीम शिंदे यांना दैनिक महावृत्त हे पुस्तक भेट देण्यात आले. या प्रसंगी रामचंद्र वंगाटे, संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती, लातूर, अशोक हनवते, संपादक–दैनिक महावृत्त व जिल्हा सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा (लातूर) तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## व्ही एस पँथर्स टिपू सुल्तान जयंती सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करणार

लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके आणि प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिनभाऊ मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही एस पँथर्स चे जिल्हाकार्याध्यक्ष अकबर शेख यांच्या नेतृत्वाखाली शेर ए हिंद टिपू सुल्तान यांच्या जयंतीनिमित्त जयंती सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे . या सप्ताहामध्ये २० नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिर २१ नोव्हेंबर रोजी अन्नदान २२ नोव्हेंबर रोजी भाषण स्पर्धा ,२३ नोव्हेंबर रोजी रंगभरण स्पर्धा ,२४ नोव्हेंबर रोजी शालेय साहित्य वाटप,२५ नोव्हेंबर रोजी सर्व धर्मस्थळ ठिकाणी वृक्षारोपण समारोह २६ नोव्हेंबर रोजी सामूहिक संविधान वाचन आणि बक्षीस वितरण समारोह घेण्यात येणार आहे . या समारोहात महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत अंतर्गत सर्व प्रभागातील विद्यार्थी आणि नागरिक सहभागी होणार असल्याची माहिती आयोजक व्ही एस पँथर्स जिल्हाकार्याध्यक्ष अकबर शेख यांनी दिली .





## पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायद्याविषयी मार्गदर्शन





लातूर, दि. १९ : केंद्र सरकारचा समाज कल्याण व सक्षमीकरण विभाग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेनुसार पालक व ज्येष्ठ नागरीकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ या विषयी जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि लातूर उपविभागीय कार्यालयाच्यावतीने मातोश्री वृद्धाश्रम येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या जनजागृती शिबिरामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष डॉ. महेश देवधर तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे संघटक डॉ. बी. आर. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे, मंडळ अधिकारी आर. के. झाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर चे कर्मचारी व मातोश्री वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ नागरिक यावेळी उपस्थित होते.

'वसुधैव कुटुंबकम'चा संदेश देणाऱ्या आपल्या देशात वृद्धाश्रमांची स्थापना होणे, ही खेदाची बाब आहे. घरातील आजी–आजोबा हे घराचा वारसा असतात. त्यामुळे घराण्याचा वारसा जपणे, घरातील प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य सचिव व्यंकटेश गिरवलकर यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरीकांची यादी पोलीस अधिक्षक कार्यालयात असणे गरजेचे आहे. तसेच ज्येष्ठ नागरीकांच्या तक्रारीचे निरासरण होण्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयात हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून देण्यात आला असून ज्येष्ठ नागरिकांनी यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक मनुष्य हा वयाची साठी ओलांडलेवर ज्येष्ठ नागरीक बनत असतो. त्यामुळे त्याची जाणीव ठेवून घरातील सर्व ज्येष्ठ नागरीकांची काळजी व हीत जपणे सर्वांची जबाबदारी आहे, असे उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे यांनी सांगितले. तसेच पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण कायदा २००७ व महाराष्ट्र पालक व ज्येष्ठ नागरिकांचे पालन पोषण व कल्याण नियम २०१० मधील तरतुदींबाबत सविस्तर माहिती दिली.

# संपादकीय

## प्रश्न नाजूक हाताळा

चव्वेचाळीस वर्षांपूर्वी ४ एप्रिल १९७९ रोजी पाकिस्तानचे माजी राष्ट्रपती व पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. पाकिस्तानच्या इतिहासात सर्वोच्च पदे भूषवलेल्या व्यक्तीस प्रथमच फासावर लटकवले. भुत्तो यांच्या कथित आदेशावरून राजकीय नेते अहमद राजा कसुरी यांच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप होता. ११ नोव्हेंबर १९७५ ला कसुरी यांच्या कारवर झालेल्या कथित हल्ल्यात त्यांचे वडील मोहम्मद कसुरी मारले गेले.

या प्रकरणात 'एफएसएफ' या पाकिस्तानी निमलष्करी दलाचे महासंचालक मसूद अहमद यांचाही समावेश होता. सत्तांतर झाल्यावर मसूद अहमद यांना अटक झाली. त्यांच्याकडून एक शपथपत्र लिहून घेण्यात आले, ज्यात भुत्तो यांनी त्यांना आदेश दिल्याचा उल्लेख होता. त्यानंतर भुत्तो यांना रातोरात फाशी दिली गेली. परंतु पुढील काळात मसूद यांची साक्ष खोटी असल्याचे पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयानेदेखील म्हटले होते. ५ जुलै १९७७ रोजी पहाटे पाकिस्तानचे लष्करप्रमुख झिया उल हक यांनी, भुत्तो आणि त्यांच्या सर्व मंत्र्यांना अटक केली. भुत्तो यांना फाशी दिल्यानंतर झिया यांच्या कारकिर्दीतच पाकिस्तानचे झपाट्याने इस्लामीकरण झाले. याच इतिहासाची पुनरावृत्ती आता बांगला देशातही होऊ घातली आहे.

गेल्यावर्षी झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान मानवतेविरोधात केलेल्या गुन्ह्यांसाठी पदच्युत पंतप्रधान शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्झमाँ खान कमाल यांना सोमवारी तेथील विशेष लवादाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. या दोघांच्याही उपस्थितीत लवादासमोर सुनावणी झाली. खरे तर बांगला देशात आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादासमोर (आयसीटी) हसीना यांच्यावरील आरोपांवर बरेच महिने सुनावणी सुरू होती. पाकिस्तानप्रमाणे बांगला देशातही लष्करशाहीचेच नियंत्रण असून, त्यामुळे भुत्तो यांच्याप्रमाणेच हसीना यांच्याबाबतही खरा न्याय झाला का, असा प्रश्न निर्माण होतो. विद्यार्थी आंदोलनादरम्यान मृत्युमुखी पडलेल्या शेकडो निदर्शकांमागे हसीना याच प्रमुख सूत्रधार होत्या आणि त्यांचेच हे सारे नियोजन होते, असा आरोप होता. गेल्यावर्षी हिंसक विद्यार्थी आंदोलनानंतर शेख हसीना ५ ऑगस्ट रोजी भारताच्या आश्रयास आल्या. त्यांना मायदेशात परत पाठवावे, असे आवाहन बांगला देशकडून वारंवार केले जात आहे. बांगला देश न्यायालयाने त्यांना 'फरार' घोषित केले आहे.

आयसीटीने हसीना यांच्या विरोधात आदेश देताना, त्यांच्यावरील आरोप पूर्ण सिद्ध झाले आहेत. विद्यार्थ्यांचे आंदोलन चिरडण्यामागे हसीना याच होत्या, असे म्हटले आहे. संयुक्त राष्ट्र संघ मानव हक्क कार्यालयाच्या अहवालानुसार, या आंदोलनामध्ये १४०० जणांचा मृत्यू झाला. निःशस्त्र जमावाचे आंदोलन पांगवण्यासाठी हसीना यांनी बळाचा वापर करण्याचे आदेश दिले. स्फोटक वक्तव्ये केली. त्यामुळे प्रक्षोभ निर्माण झाला, असेही लवादाने म्हटले आहे. लवादाचा निर्णय ऐतिहासिक आहे, असे बांगला देशच्या हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी म्हटले आहे. भारताने ताबडतोब हसीना यांचे प्रत्यार्पण करावे. तसे न केल्यास उभय देशांतील मैत्रीला तडा जाईल, असे बांगला देशच्या परराष्ट्र खात्याने म्हटले आहे. मात्र बांगला देशमधील जनतेचे हित लक्षात घेऊन दक्षिण आशियात लोकशाही, स्थैर्य व शांतता नांदावी, यादृष्टीनेच आमचे धोरण असेल, अशी सावध प्रतिक्रिया भारताने दिली आहे.

शेख हसीना यांनी १९९० मध्ये बांगला देश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या प्रमुख खालिदा झिया यांच्याशी हातमिळवणी करून, तेव्हाचे लष्करशहा इर्शाद यांच्या विरोधात लढा दिला. परंतु त्यानंतर या दोघींमध्ये स्पर्धा सुरू झाली. हसीना यांनी १९९६ साली अवामी लीगला प्रथम सत्ता मिळवून दिली आणि त्यानंतर पुन्हा २००९ मध्ये त्या सत्तेवर आल्या आणि पुढे सलग १५ वर्षे त्या सत्तेत होत्या. माजी पंतप्रधान खालिदा यांचे पती झिया उर रहमान हेदेखील बांगला देशचे अध्यक्ष होते. परंतु त्यांची हत्या झाली. भ्रष्टाचाराच्या आरोपावरून खालिदा यांना २०१८ मध्ये तुरुंगवासही घडला. हसीना यांना पदच्युत केल्यानंतर खालिदा यांची सुटका झाली. हसीना सत्तेवर असताना, मोहम्मद युनूस यांनाही लाचखोरीवरून शिक्षा झाली होती. खालिदा झिया यांचा पक्ष तसेच जमाते इस्लामी या दोन्ही पक्षांत पाकिस्तानवादी धर्मांध प्रवृत्ती आहेत. तर अवामी लीगचा कल भारताकडे असून, फेब–ुवारी २०२६ मध्ये होणार्या संसदीय निवडणुकीत भाग घेण्यास अवामी लीगवर बंदी घातली आहे. अवामी लीगचे संस्थापक आणि हसीना यांचे वडील मुजिबुर रहमान यांचे घर गेल्यावर्षी उद्ध्वस्त केले गेले. त्यांचा पुतळाही पाडला.

अनेक वर्षे सत्तेत राहिल्यानंतर हसीना यांनी लोकशाही चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. आपल्या धोरणांविरोधात निदर्शने होत असल्यास त्यामागील कारणांचा शोध घेऊन उपाययोजना करण्याऐवजी, त्यांनी त्यामागे परकीय हात असल्याचा आरोप केला. तथापि, हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्याचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही. ही केवळ सूडबुद्धीने केलेली कारवाई आहे. यापूर्वी आयसीटीच्या सदस्यांमध्ये आंतरराष्ट्रीय न्यायाधीश व वकिलांचाही समावेश असे. परंतु या लवादात असे कोणतेही सदस्य नव्हते. उलट लवाद हा पूर्णपणे पक्षपाती स्वरूपाचा होता. त्यामध्ये खालिदा यांच्या बांगला देश नॅशनॅलिस्ट पार्टीचे सदस्य असलेले न्यायाधीश होते. हसीना यांच्या वतीने बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधीच दिली गेली नाही. सरकारने बचाव पक्षासाठी नेमलेल्या वकिलांनी कोणतेही साक्षीदार बोलावले नाहीत. हसीना यांच्या हकालपट्टीनंतर बांगला देशात हिंदूंवर अत्याचार वाढले. कट्टरतावादही वाढला आहे. हसीना यांनी बांगला देशात आर्थिक भरभराट आणली होती आणि भारत–बांगला देश संबंध अतिशय सलोख्याचे होते. आता मात्र बांगला देशात भ्रष्टाचार व बेकारी वाढली असून, देश नेतृत्वहीन बनला आहे. भले ते नोबेल विजेते अर्थशास्त्रज्ञ का असेनात, पण मोहम्मद युनूस हे लष्कराच्या मदतीने हसीना यांच्याबाबतचे आपले जुने हिशेब चुकते करत आहेत. हसीना यांची बांगला देशात परतपाठवणी करणे, हे त्यांच्या जीविताच्या दृष्टीने धोक्याचेच ठरेल.

परंतु भारतानेही हा प्रश्न नाजूकपणे हाताळून बांगला

# भूतानचा काय फायदा

भूतान सामरीकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. चीनच्या बेल्ट अँड रोड प्रकल्पात सहभागी न होणारा भूतान हा भारताचा एकमेव शेजारील देश आहे. पंतप्रधान मोदींच्या भेटीतून भूतानमधील गुंतवणुकीला आणखी चालना मिळणार आहे.

भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल सिंग्ये वांगचुक यांच्या निमंत्रणाला मान देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दोन दिवसांचा भूतान दौरा नुकताच पार पडला. लाल किल्ला परिसरातील स्फोटाने देश हादरलेला असताना आपण भूतानला अतिशय जड अंत:करणाने आलेलो आहोत, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया दिली. वास्तविक भूतानच्या दौर्यास मोदी सरकारने नेहमीच महत्त्व दिले आहे. या दौर्यात पंतप्रधान मोदी यांनी एक हजार मेगाव्हॅटच्या हायड्रो प्रोजेक्टचे अनावरण केले. तसेच ऊर्जा, रेल्वे, दळणवळण आणि विकासकामांवर देखील चर्चा यावेळी पार पडली. याशिवाय दहा हजार कोटी रुपयांची आर्थिक मदतही भारताकडून दिली जाणार आहे. यावरून भारत भूतानला किती महत्त्व देतो, हे लक्षात येते. पंतप्रधानांच्या या दौर्यादरम्यान भूतानच्या १३ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत भूतानमध्ये आकाराला येत असलेल्या विविध प्रकल्पांच्या संदर्भात भारताने केलेल्या मदतीबद्दल तसेच भूतानच्या विकासात भारताने दिलेल्या योगदानाबद्दल भूतानतर्फे देखील कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



भूतान हा भारताचा सर्वात लहान शेजारी देश. परंतु त्याचे सामरिक स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण एकीकडे चीनच्या ताब्यात असलेले तिबेट आणि दुसरीकडे भारत. गेल्या ११ वर्षांत मोदींनी चार वेळेस भूतानला भेट दिली. भूतानचे पंतप्रधान आणि राजांनी देखील भारताचे सतत दौरे केले आहेत. याप्रमाणे उभय देशांकडून संवेदनशील संबंधांना दिले जाणारे राजनैतिक महत्त्व अधोरेखित होते. भूतान एकाकी पडला किंवा तो थोडाही शिथिल वाटला तर विस्तारवादी ड्रॅगन कधी गिळकृंत करेल, यांचा भरवसा नाही. शिवाय भारताच्या सीमेवर आणखी एक डोकेदुखी वाढविण्याचे काम करेल.

तिबेटमध्ये १९५० च्या दशकात चीनने घुसखोरी केली आणि ती भारतासाठी कायम स्वरूपात अडचणीची बाब ठरली. सध्याचा चीनचा विस्तार पाहता भारताला चीनच्या सावटाखाली भूतान राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागणार आहे. चीनकडून बळजबरीने ताबा घेण्यापासून त्याला वाचविणे हा केवळ पुस्तकी किंवा सैद्धांतिक मुद्दा राहिलेला नाही. सीलाईट नावाच्या एक आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थेच्या मते, अलीकडच्या काळात चीनने भूतानच्या पारंपरिक सीमेच्या आत किमान २२ गावांची निर्मिती केली असून तो भूतानच्या एकूण क्षेत्रफळाच्या तुलनेत दोन टक्के जागांवरील ताबा मानला जात आहे. चीनने वसविलेल्या या गावांत रस्ते, सैनिकी चौकी, प्रशासकीय केंद्राचा समावेश आहे. यास चीनने ठोस आधार सादर केला असून त्याला नकार देणे सहजासहजी शक्य नाही. चीनने सीमेसंदर्भात भूतानशी केलेल्या चर्चेत नवीन दावे केले आणि यानुसार भूतानचे सार्वभौमत्व हळूहळू कसे अस्तंगत होईल आणि सैन्य भारताच्या सीमेला कसे घेरेल यादृष्टीने ड्रॅगनच्या हालचाली सुरू आहेत. २०१७ मध्ये डोकलाममध्ये चीनने बेकायदा मार्गाने रस्ता उभारण्याचा प्रयत्न केला. तो एक दीर्घकालीन योजनेचा भाग होता. हा धोका रोखण्यासाठी भारतीय लष्कराने ७३ दिवस चीनच्या सैनिकांशी संघर्ष केला. शेवटी चीनला डोकलाममधून माघार घ्यावी लागली.

भूतानच्या अस्तित्वासाठी चीनचा वाढता धोका पाहता भारत भूतानच्या सैनिकांसाठी अत्याधुनिक संरक्षण उपकरण व अन्य सुविधा देत आहे. २००७ मध्ये भारत–भूतान कायम मैत्री करारानुसार उभय देश राष्ट्रीय सुरक्षेसाठी आव्हान ठरणार्या घडामोडींचा संयुक्तपणे मुकाबला करतील असे ठरवण्यात आले. तसेच चीनची घुसखोरी आणि परिसर ताब्यात घेण्याचे मनसुबे उधळून लावणे हे भारत आणि भूतान यांचे प्रथम कर्तव्य असेल. भूतानला भारताचे सैन्य सहकार्य हा संवेदनशील मुद्दा असताना यासंदर्भात त्याची सार्वजनिक चर्चा केली जात नाही किंवा घोषणा होत नाही. अर्थात मोदी सरकार भूतानच्या उत्तर आणि पूर्व भागातील धोका ओळखून आहे आणि गरजेनुसार स्रोत उपलब्ध करून देत आहे.

भूतानला आपल्या प्रभावाखाली आणण्याच्या दृष्टीने चीनकडून आर्थिक प्रलोभन दाखविले जात आहे. चीनच्या बेल्ट अँड रोड प्रकल्पात सहभागी न होणारा भूतान हा भारताचा एकमेव शेजारील देश आहे. अशा वेळी भूतानचा आर्थिक विकास, व्यवस्थेंतर्गत सुधारणा आणि आधुनिकीकरणाच्या प्रती भारताची जबाबदारी आणखीनच वाढते. पंतप्रधान मोदींच्या भेटीतून भूतानमधील गुंतवणुकीला आणखी चालना मिळणार आहे. आसाममधील कोक्राझार ते भूतानच्या न्यू गेलेफु माइंडफुलनेस सिटीपर्यंत ५८ किलोमीटरचा रेल्वेमार्ग करण्यात येत आहे. यास साडेतीन हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या रेल्वेमार्गामुळे उभय देशांतील व्यवसाय आणि पर्यटन विकास होईल. अवकाश उपग्रहापासून ते आर्थिक तंत्रज्ञानापर्यंत भारत भूतानची मदत करत आहे. अनेक वर्षांपासून भारत भूतानला सहकार्य करत आहे. २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात २१५९ कोटी रुपये देण्यात आले. यावरून भारत हा दक्षिण आशियातील शेजारील देशाचा प्रमुख सहकारी होण्यासाठी नेहमीच उत्सुक असून याबाबतीत चीनशी स्पर्धा करण्यास कदापि मागे हटणार नाही, हे स्पष्ट होते.

विकास आणि संरक्षणाबरोबरच भारताने संस्कृती आणि आध्यात्मिकतेला देखील भूतानच्या संबंधांत महत्त्वाचे स्थान दिले आहे. भूतानची आठ लाखांपेक्षा कमी असणारी लोकसंख्या ही अत्यंत धर्मनिष्ठ असून ती आपला अद्वितीय बौद्ध वारसा जोपासण्यासाठी सजग आहे. आशियातील बौद्ध धर्माचा प्रचारक म्हणून भारताने नेतृत्व करत भूतानच्या नागरिकांच्या मनात स्थान मिळवले आहे. दुसरीकडे नास्तिक चीनने तिबेटमध्ये बौद्ध धर्माच्या विरुद्ध भूमिका घेत सांस्कृतिक हानी केली आणि त्याचेवळी लोकशाहीची मूल्ये जोपासणार्या भारताची अनेक शतकांची आध्यात्मिक परंपरा सुरक्षित राहिली आहे. शिवाय भूतानच्या समुदायात भारतविरोधी भावना विकसित होणार नाही, याची पूर्णपणे खबरदारी घेतली जात आहे. भूतान हा भारताचा सर्वात विश्वासू शेजारी देश आहे. भारतविरोधी भावना नसल्याने तेथे सामाजिक समरसता चांगल्यारीतीने विकसित झाली आहे. म्हणूनच चीन नेपाळ, बांगला देश, श्रीलंका आणि मालदीवप्रमाणेच भूतानमध्ये घुसखोरी करत भारतविरोधी भावना तीव्र करण्याचा प्रयत्न करत आहे. भविष्यात चीनच्या कारस्थानांचा मुकाबला करण्यासाठी भारताला भूतानच्या सर्व समुदायाशी संवाद वाढवावा लागेल आणि सर्वसामान्यांना देखील विश्वासात घ्यावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी भूतानला वारंवार जात असतील तर उभय देशांतील मैत्री अधिक दृढ होत राहील.

# इगो

भाजप – शिंदेंची शिवसेना – राष्ट्रवादी (अजित पवार) यांना केंद्र व राज्यातील सत्तेचा आधार आहे. मात्र नगर परिषद निवडणुकीत स्थानिक पातळीवर तेच घटक पक्ष परस्परांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र दिसते.



नाशिकसह खानदेशात नगर परिषदांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आणि जिल्ह्यातील ११ नगर परिषदांसाठी हजारो अर्ज दाखल होताच संघर्ष अधिक तीव– झाला आहे. या निवडणुकीत पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक गणिते, वैयक्तिक गट–तट, सूडभावना आणि येणार्या महापालिका–विधानसभा समीकरणांचा प्रभाव जास्त जाणवत आहे. बहुतांश ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडी हे नावापुरते आघाडीचे समीकरण दिसत असून प्रत्यक्षात 'सोयीचे राजकारण' निर्णायक ठरते आहे.

भाजप – शिंदे सेना – राष्ट्रवादी (अजित पवार) यांना केंद्र व राज्यातील सत्तेचा आधार आहे. मात्र स्थानिक पातळीवर तेच घटक पक्ष परस्परांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र दिसते. येवला येथे शिंदे गट व शरद पवार गट युती करतात, तर सिन्नर व त्र्यंबकेश्वर येथे महायुतीतीलच भाजप, शिंदे सेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट परस्परांशी लढत आहेत. ओझरमध्ये भाजप स्वतंत्र, तर शिंदे सेना व राष्ट्रवादी एकत्र ही विरोधाभासी उदाहरणे मतदारांना गोंधळात टाकणारी आहेत. मुख्य सत्ताधारी आघाडीत एकवाक्यता नसणे ही लोकशाहीतील दुर्भाग्याची बाब म्हणावी लागेल.

खानदेशातही चित्र वेगळे नाही. जळगावमध्ये भाजप नेते गिरीश महाजन आणि शिंदे शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांच्यातील संघर्ष तीव– होत आहेत. महायुती अंतर्गतच टक्कर 'सत्ता समन्वया'ऐवजी 'इगो समन्वया'वर चालली, असे स्पष्ट होते. चोपड्यात अजित पवार व शरद पवार गटांची भाजपसोबत अजब युती, तर चाळीसगाव येथे भाजप स्वबळावर आणि त्याविरोधात चार घटक पक्षांची प्रस्तावित युती या राजकीय 'सरमिसळीत' मतदारांच्या विचारपूर्व निर्णयक्षमतेची कसोटी लागणार आहे.

या संपूर्ण घडामोडीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आदर्श, धोरण, विचार, विकास आणि पक्षनिष्ठा यापेक्षा सध्याच्या राजकारणात वैयक्तिक मर्जी, गटाचा दबाव, जिंकण्यासाठी कुणासोबतही हातमिळवणी आणि राजकीय पुनर्वसन हेच निकष दिसून येत आहेत. शहर विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, वाहतूक व्यवस्थापन या मूलभूत गरजा केंद्रस्थानी असायला हव्यात. पण त्याऐवजी नगर परिषदेच्या निवडणुकीतही सत्तापालट, वर्चस्व, सूड आणि प्रतिमासंघर्ष याचीच हवा आहे. युती, फूट आणि गटातटांचा खेळ जसजसा वाढत आहे, तसतसे राजकीय स्थैर्य व प्रशासनिक सातत्य यांच्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. निवडणूक जिंकण्यासाठी स्थानिक लाभ, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि तात्पुरते करार करण्यात येत आहेत. मात्र मतदारांना याचा थेट परिणाम पुढील पाच वर्षांत दिसेल.

नगर परिषदेच्या निवडणुकीत पक्ष नेते, मंत्री, खासदार किंवा आमदार यांची ताकद उपयोगी पडलीच पाहिजे असे नाही. अनेक ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांची प्रतिमा, कामाचा ट्रॅक रेकॉर्ड आणि नागरिकांशी दैनंदिन संपर्क अधिक निर्णायक ठरतो. त्यामुळे या निवडणुकीचा निकाल फक्त राजकीय नकाशा बदलेल असे नाही, तर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिका निवडणुकांसाठी महत्त्वाचे संकेतही देणार आहे. मतदारांनी यावेळी पक्षांपेक्षा उमेदवाराच्या प्रामाणिकतेची आणि स्थानिक विकासाची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. 'युती कोणासोबत आणि विरोध कुणाचा' यापेक्षा 'शहराचा विकास, पारदर्शक निधी वापर, शहरी पायाभूत नियोजन आणि उत्तम प्रशासन कोण देऊ शकते' हे मतदारांनी विचारायला हवे. लोकशाहीचे खरे सामर्थ्य नागरिकांनी मतदान करून जबाबदार नेतृत्व उभे करण्यामध्ये आहे. यावेळी निवडणूक फक्त पक्षांची नसून मतदार जागृतीची असणे गरजेचे आहे. कारण अखेर शहराची नियती मतदारांच्या बोटांनीच बदलते!

# जाणून घ्या, वजन कमी करण्यासाठी पेरूचा ‘सीक्रेट फॉर्म्युला’!

वजन कमी करण्यासाठी लोक अनेक उपाय करतात जिम, डायट, फॅन्सी सुपरफुड्स, प्रोटीन शेक्स, पण आपल्या घरात अगदी सहज मिळणारा, साधा आणि स्वस्त असा एक फळ वजन कमी करण्यासाठी किती प्रभावी आहे हे अनेकांना माहीतच नसतं. हे फळ म्हणजे पेरू. होय, हा साधा हिरवा पेरू तुमचं वजन कमी करण्याचा ‘सीक्रेट फॉर्म्युला’ ठरू शकतो.

पेरूमध्ये व्हिटॅमिन उ, भरपूर फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि शरीराला आवश्यक असणारी अनेक सूक्ष्म पोषणद्रव्यं असतात. विशेष म्हणजे, सकाळी रिकाम्या पोटी अमरूद खाल्ल्यास वजन कमी होण्याची प्रक्रिया अधिक वेगाने आणि नैसर्गिकरीत्या सुरू होते. अनेक फिटनेस एक्स्पर्ट्स आणि डायटिशियन पेरूला ‘सुपर स्लिमिंग फूड’ मानतात. त्याचं कारणही तितकंच दमदार आहे. कमी



कॅलरी, जास्त फायबर आणि पोट भरून राहणारी क्षमता. सकाळी रिकाम्या पोटी पेरू खाल्ल्यानं पचनाला गती मिळते. रात्रीचा घेतलेला अन्नाचा अवशेष योग्य प्रकारे साफ होतो आणि आतड्यांची हालचाल सुधारते. फायबर जास्त असल्यामुळे पोट जास्त वेळ भरल्यासारखं वाटतं, त्यामुळे दिवसभर अनावश्यक भूक लागत नाही आणि ओव्हरईटिंगवर नियंत्रण राहतं. हेच वजन कमी करण्यातील सर्वात मोठं पाऊल आहे.

पेरू इन्सुलिन लेव्हलला स्थिर ठेवतो. विशेष म्हणजे ज्या लोकांना ब्लड शुगर कंट्रोल ठेवण्यात अडचणी येतात, त्यांच्यासाठी अमरूद अत्यंत उपयुक्त आहे. सकाळी पेरू खाल्ल्यास रक्तातील साखर वाढत नाही आणि शरीरातील ऊर्जेचं प्रमाण संतुलित राहतं. त्यामुळे थकवा येत नाही आणि दिवसभरातील कार्यक्षमता टिकून राहते.

पेरूमध्ये असणारे अँटिऑक्सिडंट्स शरीरातील दाह कमी करतात. शरीरात सूज किंवा इन्फ्लेमेशन असेल तर वजन कमी होत नाही. हा अनेकांना न समजणारा मुद्दा आहे. पेरू नियमित खाल्ल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात आणि मेटाबोलिझम (चयापचय) वेगानं काम करतं. मेटाबोलिझम वाढला की शरीर जास्त कॅलरी जाळतं आणि चरबी कमी होऊ लागते.

पेरूचं आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे त्यात असणारा व्हिटॅमिन उ चा भरपूर पुरवठा. व्हिटॅमिन उ हे इम्युनिटी वाढवण्यासाठी खूप महत्त्वाचं. वजन कमी करताना शरीर कमकुवत होऊ नये म्हणून रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवणं महत्त्वाचं आहे. पेरू एकाचवेळेस स्लिमिंग आणि इम्युनिटी बूस्टिंग दोन्ही फायदे देतो.

सकाळी पेरू खाल्ल्यास पोट हलकं राहतं, पचन सुधारतं, पोट साफ राहतं आणि गॅस ॲसिडिटीची तक्रारही कमी होते. त्यामुळे शरीर हलकं आणि ऊर्जावान वाटतं. दिवसभर जास्त कॅलरी खर्च होतात आणि काही आठवड्यांत वजन कमी होत असल्याचं स्पष्ट जाणवतं.

पेरू खाण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे सकाळ. साधारण एका मध्यम आकाराच्या पेरूमध्ये ६०-७० कॅलरी असतात. इतक्यातसुद्धा पोट चांगलं भरतं आणि सकाळच्या नाश्त्यापर्यंत भूक लागत नाही. वजन कमी करण्याच्या प्रवासात हे खूप मोठं प्लस पॉईंट आहे.

थोडक्यात सांगायचं तर वजन कमी करायचं असेल, शरीर हलकं ठेवायचं असेल, ब्लड शुगर नियंत्रणात ठेवायचं असेल आणि पोटाचे आजार दूर ठेवायचे असतील तर पेरू हे तुमचं साधं पण दमदार ‘मॉर्निंग सुपरफूड’ ठरू शकतं. स्वस्त, सहज उपलब्ध आणि शून्य साइड इफेक्ट्स पेरूसाठी हे तीन शब्द अगदी खरे ठरतात. फक्त काही आठवड्यांत तुम्हाला बदल जाणवू लागेल.

# हिवाळ्यात हात-पाय सुजतात? जाणून घ्या सोपे घरगुती उपाय

हिवाळा सुरू झाला की अनेकांना हाताच्या आणि पायाच्या बोटांमध्ये सूज येणे, ठणका जाणवणे, तसेच खाज आणि सौम्य वेदना जाणवणे ही समस्या त्रासदायक ठरते.



हिवाळा सुरू झाला की अनेकांना हाताच्या आणि पायाच्या बोटांमध्ये सूज येणे, ठणका जाणवणे, तसेच खाज आणि सौम्य वेदना जाणवणे ही समस्या त्रासदायक ठरते. विशेषत: थंड वाऱ्यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि त्या भागात रक्तपुरवठा कमी होतो. त्यामुळे त्वचा लालसर होणे, सूज येणे आणि बोटांमध्ये उष्णतेसारखी जळजळ निर्माण होऊ शकते.

अनेक जण अशावेळी आग, चूल किंवा हीटरला हात-पाय सरळ लावून लगेच उष्णता देण्याचा प्रयत्न करतात; पण हे उपाय शरीराला हानीकारक ठरू शकतात. योग्य पद्धतीनं आणि हळूहळू उब दिली तरच सूज कमी होते. यासाठी घरच्या घरी काही उपाय त्वरीत आराम देऊ शकतात.

थंडीत बोटांची सूज ही सामान्य समस्या असली तरी ती वारंवार होत असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये. सतत थंडीच्या संपर्कात राहणे, गरम कपड्यांचा कमी वापर, रक्ताभिसरण व्यवस्थित न होणे, काही वेळा थायरॉईड किंवा इतर आरोग्यविषयक समस्या हेही कारण ठरू शकतात. अशा वेळी तात्पुरते घरगुती उपाय उपयोगी ठरतात, पण समस्या वाढल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते.

सर्वात पहिले, थंडीत सुजलेल्या बोटांना अचानक जास्त उष्णता देऊ नका. अनेक जण हात-पाय चुलीला, स्टोव्हला किंवा हीटरला अगदी जवळ नेतात आणि त्वरित आराम मिळेल असा विचार करतात. पण लगेच तीव्र उष्णता दिल्याने रक्तवाहिन्या अधिक वेगाने फुगतात आणि त्यामुळे लालसरपणा व जळजळ वाढते. त्यामुळे हळूहळू उब देणारे उपायच योग्य मानले जातात.

पहिला उपाय म्हणजे कोमट पाण्याचा वापर

एका बशीमध्ये कोमट (जास्त गरम नाही) पाणी घेऊन त्यात हात किंवा पाय पाच-दहा मिनिटे ठेवावेत. यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि सूज हलकेच उतरू लागते. हा उपाय दिवसातून दोनदा केला तरी चांगला फरक जाणवतो.

दुसरा उपाय म्हणजे नारळ, मोहरी किंवा तीळ तेलाचा हलका मसाज

कोमट केलेल्या तेलाने बोटांवर आणि त्यांच्या सांध्याजवळ सौम्य मसाज केल्यास रक्तप्रवाह सुधारतो. मसाज करताना खूप दाब देऊ नये; हलक्या हाताने गोलाकार हालचाली कराव्यात. यामुळे वेदनामुक्ती जलद मिळते आणि जळजळही कमी होते.

तिसरा प्रभावी उपाय म्हणजे ॲलोवेरा जेल

थोडं थंडगार ॲलोवेरा जेल सूजलेल्या जागी लावलं की त्वचेला आराम मिळतो. त्यात असलेल्या नैसर्गिक घटकांमुळे लालसरपणा कमी होतो आणि त्वचा शांत होते.

चौथा घरगुती उपाय म्हणजे मीठाच्या पाण्याचा वापर

एका भांड्यात कोमट पाण्यात थोडं मीठ मिसळून त्यात हात-पाय बुडवल्यास सूज आणि वेदना कमी होण्यास मदत होते. मीठ शरीरातील दाह कमी करण्यास मदत करतं.

घराबाहेर जाताना गरम हातमोजे, मोजे आणि कानटोपी वापरल्यास थंड वाऱ्याचा थेट परिणाम कमी होतो. रात्री झोपताना गरम सॉक्स घातले तरी रक्ताभिसरण सुधारते.

जर सूज खूप वाढली असेल, बोटं निळसर दिसत असतील, सतत वेदना जाणवत असेल किंवा ही समस्या दरवर्षी गंभीर स्वरूपात होत असेल तर डॉक्टरांकडे जाणे आवश्यक आहे. काही वेळा ही समस्या चिलब्लेन्स, फ्रोस्टबाइट, किंवा रक्ताभिसरणातील गडबडीमुळेही होऊ शकते.

योग्य वेळी योग्य काळजी घेतली तर हिवाळ्यातील बोटांची सूज सहज कमी होते आणि दैनंदिन कामांमध्ये अडथळा येत नाही. हलके, सुरक्षित आणि घरगुती उपायांनी हे लक्षण त्वरित आटोक्यात आणता येते.

# वाढत्या थंडीमध्ये घरी बनवा गरमागरम पालक सूप! शरीरात कायम टिकून राहील उबदारपणा, नोट करा रेसिपी

आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये पालक सूप बनवण्याची रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ कमीत कमी साहित्यात झटपट बनतो. थंडीच्या दिवसांमध्ये घरात वेगवेगळे सूप बनवले जातात.

देशभरात सगळीकडे कडाक्याची थंडी पडली आहे. थंडीच्या दिवसांमध्ये सगळ्यांचं काहींना काही गरमागरम आणि झणझणीत पदार्थ खाण्याची इच्छा होते. या दिवसांमध्ये शरीराची रोगप्रतिकारशक्ती काहीशी कमी होऊन जाते. शरीरात थकवा, अशक्तपणा वाढू लागल्यानंतर आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. थंडीत प्रत्येक घरात कोणत्या ना कोणत्या भाजीपासून किंवा चिकन सूप बनवले जाते. सूप प्यायल्यामुळे शरीरात उबदारपणा कायम टिकून राहतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला गरमागरम पालक सूप बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या आरोग्यासाठी पालक अतिशय फायदेशीर आहे. पालक खाल्ल्यामुळे शरीरात कधीही रक्ताची कमतरता जाणवत नाही. रोजच्या आहारात नियमित एक पालेभाजी खावी. पालकमध्ये असलेल्या लोहामुळे शरीरात निर्माण झालेली हिमोग्लोबिनची कमतरता भरून निघते आणि शरीरात थकवा, अशक्तपणा जाणवत नाही. चला तर जाणून घेऊया गरमागरम पालक सूप बनवण्याची सोपी रेसिपी.(फोटो सौजन्य -

साहित्य:

पालक

काळीमिरी पावडर

कांदा

लसूण

आलं

टोमॅटो

तेल

मीठ

लिंबाचा रस

१५ मिनिटांत अस्सल गावरान पद्धतीमध्ये बनवा चमचमीत टोमॅटो शेव भाजी, दुपारच्या जेवणात होईल चविष्ट बेत

कृती:

पालक सूप बनवण्यासाठी सर्वप्रथम, पालक स्वच्छ साफ करून काहीवेळ पाण्यात भिजत ठेवा. त्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवून घ्या.

कुकरच्या भांड्यात स्वच्छ धुवून घेतलेला पालक आणि पाणी घालून शिजवून घ्या. थंड झाल्यानंतर शिजवलेला पालक मिक्सरच्या भांड्यात टाकून पेस्ट बनवा.

पॅनमध्ये तेल गरम करून त्यात बारीक चिरलेली लसूण, आलं, कांदा आणि टोमॅटो घालून सोनेरी रंग येईपर्यंत व्यवस्थित शिजवा. त्यानंतर कांदा थंड झाल्यावर मिक्सरच्या भांडयात टाकून पेस्ट बनवा.

त्याच कढईमध्ये पुन्हा एकदा थोडस तेल घालून तयार केलेली पेस्ट घालून व्यवस्थित मिक्स करा. नंतर त्यात पाणी घाला.

सूपला एक उकळी आल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ, काळीमिरी पावडर आणि लिंबाचा रस घालून व्यवस्थित मिक्स करा.

आवश्यकता वाटल्यास तुम्ही त्यात फ्रेश क्रीमसुद्धा घालू शकता. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले पालक सूप.

# चर्मकार समाजाची उषा पवार झाली पोलीस उपअधीक्षक

मुंबई /प्रतिनिधी :- १८ नोव्हेंबर२०२५ रोजी उषा गंगाराम पवार यांची पोलीस उपअधीक्षक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा श्री संत रोहिदास नगर मालाड पूर्व सोसायटीतर्फे सत्कार करण्यात आला, उषाताई यांनी प्रतिकुल परिस्थितीवर मात करून भाऊ चप्पल बूट दूरूस्तीची काम करुन बहीणीला शिकवले फार हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या आपले मनोगत व्यक्त करताना डोळे भरून येतील असे भावनिक भाषण केले समाजातील मुलांना शालेय शिक्षणापासून वंचित ठेउ नये, त्यांना शिक्षणासाठी पालकांनी सर्वोपरी प्रयत्न केला पाहिजे तरच त्या एके दिवशी आपले व कुटुंबाचे नांव होइल समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देता येईल, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्यासाठी शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही..! म्हणून आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न केला पाहिजे व समाजातील मुले मुली यांच्या साठी अभ्यासिका बांधाव्यात तिथुनच आय ए एस सारखे मोठे अधिकारी तयार होतील अशा आशयाचे निवेदन त्यांनी केले आहे त्यावेळी चर्मकार समाजाचे नेते मा रवींद्र जाधव मा रवींद्र ठाकरे मा रामचंद्र अहिरे मा दादाभाऊ माने राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुंबई कार्याध्यक्ष मा बाबू गोरे, पत्रकार मधुकर गवई मा अशोक पवार मा गणेश बर्वे



मा ज्ञानेश्वर अहिरे मा त्रिंबक पवार मा राजेंद्र वाल्मीक पवार मा संभाजी अहेर मा राजेंद्र कारभारी पवार मा. महेंद्र ठाकरे मा गणेश कथेपूरीमा नारायण रखमे मा गोरख गायकवाड मा अशोक पाथरे शोभाबाई दादाजी अहिरे संत रोहिदास चर्मकार समाज मंडळ मालाड पूर्व मुंबई यांच्या वतीने बाळू उत्तम अहिरे यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना त्यांच्या पुढील वाटचाली करीता शुभेच्छा देण्यात आल्या.

# कल्याणराव हनवते (दै. महावृत, सहसंपादक) यांची छ. शिवाजी महाराज विद्यालय, बिटरगाव येथे सदिच्छा भेट




रेणापूर प्रतिनिधी : - छ. शिवाजी महाराज विद्यालय, बिटरगाव येथे दैनिक महावृत्त चे ज्येष्ठ पत्रकार, सहसंपादक श्री कल्याणराव हनवते यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यालयातील प्रगतीकारक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. या भेटीदरम्यान विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सूर्यकांत चव्हाण यांनी शाळेतील शैक्षणिक उपक्रम, ई-लर्निंग व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे नाविन्यपूर्ण प्रयोग यांची माहिती दिली. ग्रामीण भागातही शैक्षणिक गुणवत्ता आणि सुव्यवस्था टिकवून ठेवत उत्तुंग ध्येयाने कार्य करणाऱ्या या विद्यालयाचे त्यांनी कौतुक केले. शाळेतील ग्रंथालय, संगणक कक्ष, विज्ञान लॅब तसेच विविध विद्यार्थी प्रकल्पांची पाहणी करताना श्री हनवते यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवले. त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्य, शिस्त आणि मेहनतीचे महत्त्व पटवून देत उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्याध्यापक श्री वसंत यादव, विनोद जाधव, मल्लिकार्जुन ठोंबरे, रमाकांत यशवंत, अरूण काळे, श्री गंगाधर इरले इत्यादी सरांनी अगदी मनापासून शाल व पुष्पगुच्छ देऊन माझा जाहीर सत्कार केला, त्याबद्दल हनवते यांनी शिक्षकेतर कर्मचारी यांचे मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करून देशाचे उज्वल भविष्य यांच्या शैक्षणिक कार्यास आपल्या सर्वांकडून विद्यार्थ्यांना मोलाचे आणि चांगल्या प्रकारे मार्गदर्शन मिळो हीच पुढील कार्यास मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या व सर्व उपस्थित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करून निरोप घेतला.

# दुःख निवारणासाठी मूळ कारणांचा शोध आवश्यक आहे. बी. बी. मेश्राम
## यशोधरा बुद्ध विहारात १४३ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : रोग निदान झाल्याशिवाय आजारावर औषधोपचार शक्य नाही, या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वावर आधारित आणि दुःख निवारण्याचा मार्ग दाखविणे हेच बुद्ध धर्माचे अंतिम ध्येय या त्यांच्या काठमांडूतील चौथ्या जागतिक बौद्ध धर्म परिषद (१९५६) येथील विधानाच्या अनुषंगाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १४३ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा १६ नोव्हेंबर २०२५ रोजी यशोधरा बुद्ध विहार, यशोधरा नगर, सिडको येथे उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम होते. मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी महाड सत्याग्रहातून दिलेल्या संदेशाप्रमाणे आजाराचे अचूक निदान झाले तरच उपचार प्रभावी होतात. त्याचप्रमाणे दुःख निर्माण होण्याचे मूळ कारण ओळखल्याशिवाय त्याचे निवारण होऊ शकत नाही. ते पुढे म्हणाले की, कार्यकारिणी सदस्य व सक्रिय कार्यकर्त्यांसाठी स्वतंत्र कार्यशाळा घेऊन प्रथम स्वतःच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत. महिलांचा सहभाग अत्यावश्यक असून, मुलांच्या संस्कारांत त्यांच्या भूमिकेमुळे चळवळीला बळकटी मिळते. काठमांडू परिषदेत ३० देशांतील ६२५ आमंत्रित प्रतिनिधी पैकी ४०० प्रतिनिधी सहभागी झाले होते, याचा उल्लेख करून त्यांनी बुद्ध धम्माची क्षीणावस्था आणि पुनरुज्जीवनाची आशा याविषयी बाबासाहेबांनी केलेले भाष्य उपस्थितांना स्मरण करून दिले.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना य.स.गृ. सं.म. सांस्कृतिक समितीच्या मुख्य समन्वयक संगीता गडवे म्हणाल्या की, दुःखाचे मूळ कारण आपण स्वतःच असल्यामुळे स्वयंप्रकाशित होणे गरजेचे आहे. तेव्हाच चळवळ गतिमान होईल.

धम्ममित्र रामहरी निकाळजे म्हणाले की,डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारून लयास गेलेल्या धम्माला नवसंजीवनी दिली. समता, स्वातंत्र्य व बंधुता या त्रिसूत्रीचा स्वीकार करून समयसूचकतेने चळवळ मजबूत केली पाहिजे.

डॉ. बालाजी म्हणाले की, समताधिष्ठित बुद्ध धम्म असूनही पूर्वी त्याचा ऱ्हास का झाला, याचा अभ्यास आवश्यक. डॉ. रमेशचंद्र धनेगावकर म्हणाले की, विचारांचे वारसदार होण्यासाठी त्याचे आचरण महत्त्वाचे आहे. शशिकांत काळे (उद्योजक) म्हणाले की, केवळ नावापुरते बौद्ध होऊन चालत नाही; पुरेसे विद्यार्जन अत्यावश्यक आहे. गौतम जोगदंड म्हणाले की, नकारात्मकतेला नाकारून सकारात्मकतेचे स्वागत करावे. टी. एस. चव्हाण (साहित्यिक) म्हणाले की, परिपूर्ण ज्ञानाशिवाय प्रगती अशक्य. सिद्धार्थ तुपे (सचिव) म्हणाले की, अल्प सहभागदेखील चळवळीला महत्त्वाची दिशा देतो. विजय मगरे (अध्यक्ष) म्हणाले की, शिव्या-शाप देणाऱ्यांना क्षमा करणे हीच खऱ्या अर्थाने पुढची पायरी. कार्यक्रमाची सुरुवात पंचशील त्रिसरणाने झाली. ॲड. विलास रामटेके यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक दिवाकर मोरे यांनी तर आभार प्रदर्शन विजय मगरेंनी केले. संभाजी गायकवाड यांनी जीवनाचे सोने झाले हे गीत सादर करून कार्यक्रमाला सांस्कृतिक छटा दिली. या कार्यशाळेला गोदावरी भगत, शीला शेळके, सविता मोरे, डॉ. बालाजी, सचिन तुपे, रमेश खडसे, दिलीप गडवे, अशोक देहाडे, एस. एस. भगत, सतीश मोकळे, एन. एन. गजहंस, एम.डी. खिल्लारे आदी मान्यवर व प्रतिनिधी उपस्थित होते.

# रक्तदान हेच महादान-डॉ.महेश शिंदे



लातूर- लातूर येथील प्रसिध्द मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटलचे प्रमुख डॉ.महेश शिंदे यांचा ३८ वा वाढदिवस रक्तदान व अन्नदान करून उत्साहात साजरा करण्यात आला. मोरया क्रिटीकेअर हॉस्पीटल व संजीवनी ब्लड बॅक यांच्या संयुक्त विदयामाने साजरा करण्यात आलेल्या डॉ.शिंदे यांच्या जन्मदिनानिमीत ३० जणांनी रक्तदान केले. त्याच बरोबर शासकीय वैदयकीय महाविदयालय येथे गरजू पेशंटना अन्नदान करण्यात आले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ.शिंदे म्हणाले की,गरजू लोकापर्यत डॉक्टरचे जाणे गरजेचे असुन त्यांच्या अडचणी जाणुन घेतल्या पाहिजेत. भावी काळात गरजु व्यक्तींना व्यक्तीगत पातळीवर जी मदत लागेल ती मी उपल्बध करून देणार आहे असे प्रतिपादन केले. तसेच आजपर्यंत च्या वाटचालीत सोबत असलेले डॉक्टर ,कर्मचारी यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

# चीनने पुन्हा भारताच्या पाठीत खंजीर खुपसला

बीजिंग : शांघाय सहकार्य संघटनाच्या शिखर परिषदेनंतर भारत आणि चीनमधील संबंध आता हळुहळु सुधारत असल्याचे पहायला मिळत आहे. याचदरम्यान आता अमेरिकन काँग्रेसची सल्लागार असलेल्या एका संस्थेकडून चीन आणि पाकिस्तानसंदर्भात खळबळजनक खुलासा करण्यात आला आहे. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात मोठी कारवाई केली होती, भारताने केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील अनेक दहशतवाद्यांचे ठिकाणे उद्धस्त झाले होते.भारताच्या या एअर स्ट्राईकमध्ये जवळपास शंभर दहशतवादी मारले गेले. भारताने आपल्या या एअर स्ट्राईकला ऑपरेशन सिंदूर असे नाव दिले.

दरम्यान ऑपरेशन सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष वाढला, पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, त्याला भारताने जोरदार प्रत्युत्तर दिले. भारताने या लढाईमध्ये आपल्या सुदर्शन आणि ब्रह्मोस सारख्या मिसाईलची ताकद जगाला दाखवून दिली. तर दुसरीकडे पाकिस्तानने भारतीय वायुदलाचे राफेल लढाऊ विमान पाडल्याचा दावा केला होता. आता याबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे यामुळे खळबळ उडाली आहे. अमेरिकेकडून मोठा दावा करण्यात आला आहे, अमेरिकेकडून प्राप्त रिपोर्टनुसार पाकिस्ताने भारताचे एकही लढाऊ विमान पाडलं नसल्याची माहिती समोर आली आहे.

# विलासराव देशमुख फाउंडेशन स्कूल ऑफ फार्मसी, लातूरतर्फे भव्य इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धा;२१ व २२ नोव्हेंबर रोजी लातूरमध्ये थरार

लातूर / प्रतिनिधी :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ (उङ्ग-ढण), लोणेरे यांच्या अधिपत्याखाली विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसी, लातूरतर्फे मुला-मुलींच्या इंटर कॉलेजिएट कबड्डी स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २१ व २२ नोव्हेंबर २०२५ रोजी विलासराव देशमुख फाउंडेशन स्पोर्ट्स ग्राउंड, न्यू एमआयडीसी, एअरपोर्ट रोड, लातूर येथे होणार आहे.

डीबीएटीयू अंतर्गत असलेल्या सर्व संलग्न महाविद्यालयांचा या 'मेगा स्पोर्ट्स इव्हेंट' मध्ये सहभाग असणार आहे. यावर्षीची ही क्रीडा स्पर्धा भव्य, उत्साहवर्धक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

शुभारंभ सोहळा

स्पर्धेचा शुभारंभ सोहळा २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास श्री. प्रवीण सरदेशमुख (सदस्य, कार्यकारी परिषद, उङ्ग-ढण, लोणेरे),श्री. किरण जाधव (विश्वस्त, व्हीडीएफ),श्री. समद पटेल (विश्वस्त, व्हीडीएफ),श्री. विजय देशमुख (विश्वस्त, व्हीडीएफ),सीए श्री. ऋषिकेश पाटील (संचालक, विलास बँक),श्री. रवींद्र काळे (माजी उपसभापती, विलास शुगर),श्री. संजय माने (सदस्य, नियामक परिषद, व्हीडीएफ),श्री. सचिन गायकवाड (सोलापूर विभागीय क्रीडा सचिव) यांची उपस्थिती राहणार आहे

विभागीय संघांना आमंत्रण

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. वाकुरे आणि क्रीडा समन्वयक प्रा. विक्रम वाघमारे यांनी लातूर, नांदेड, सोलापूर, धाराशिव, बीड, परभणी आदी जिल्ह्यांतील सर्व सहभागी पथकांना हार्दिक आमंत्रण दिले आहे.

सहभागी सर्व खेळाडूंना प्रेरणा देण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेला उपस्थित राहण्याचे आवाहन विलासराव देशमुख फाउंडेशन, स्कूल ऑफ फार्मसी, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी बाबत.

लातूर/प्रतिनिधी : याद्वारे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांनी आदेश क्रमांक राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दिनांक १३/११/२०२५ अन्वये मतदार यादी तयार करण्यासाठी कार्यक्रम जाहीर केला होता. सदर कार्यक्रमानुसार प्रारुप मतदार यादीवर हरकती व सुचना दाखल करण्याचा कालावधी दिनांक २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ असा आहे. राज्य निवडणूक आयोग यांचे आदेशान्वये मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला असून तो खालीलप्रमाणे आहे.

निवडणूकीचा टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख

१. राज्य निवडणूक आयोगाचे अधिसुचीत केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार केलेली प्रारुप मतदार यादी, हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक दि. २०/११/२०२५

२. प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक दि. २७/११/२०२५

३. प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे. दि. ०५/१२/२०२५

४. मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणे. दि. ०८/१२/२०२५

५ मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे दि. १२/१२/२०२५

दि. २०/११/२०२५ ते २७/११/२०२५ पर्यंत स्विकारण्यात येणार आहेत.. सदर हरकती सुचना लेखी स्वरुपात महानगरपालिका निवडणूक शाखा व झोन कार्यालय येथे हरकती व सूचना स्विकारल्या जाणार आहेत.

तसेच महानगरपालिका निवडणूक विभाग येथे प्रभाग १ ते १८ ची प्रारुप मतदार यादी पहाणेसाठी उपलब्ध आहे, झोन ए प्रभाग क्रमांक १०,११,१२,१३,१४, झोन बी १५,१६,१७,१८ झोन सी ३,४,५,६ झोन डी,१,२,७,८,९ येथे या प्रभागाच्या यादया ठेवण्यात आल्या आहे व मनपाच्या संकेतस्थळावर प्रारुप मतदार यादी मतदारांसाठी सुचना व हरकतीचे नमूने - Ｉलश्रीÍ.Íस या वर ही उपलब्ध आहे. याबाबत सर्व झोन वर नमुना अ व ब मध्येच हरकती स्विकरण्यात येणार आहे . या बाबत नागरीकांनी नोंद घ्यावी.

# लातूरमध्ये अनधिकृत होल्डिंगचा सवाल गंभीर; NSUI चा पालिकेला अल्टिमेटम



लातूर (प्रतिनिधी):

लातूर शहरात अनाधिकृतपणे लावण्यात आलेल्या होल्डिंग्स आणि युनिपोलच्या विरोधात लातूर जिल्हा छ्झ्णख ने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शहर महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी ही जाहिरातफलक उभारण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

छ्झ्णख पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, पालिकेचे नियम धाब्यावर बसवून शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत होल्डिंग्स झळकत आहेत. या प्रकरणी महानगरपालिकेने कोणतीही कारवाई न केल्याने शहरातील नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण पसरले आहे.

संघटनेतर्फे महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊन दुजाभाव न करता तातडीने अनधिकृत फलक हटवण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने त्वरीत कारवाई न केल्यास लातूर जिल्हा छ्झ्णखकडून महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

शहर स्वच्छता, नियोजन आणि कायदेपालनाच्या दृष्टीने या प्रकरणी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडूनही होत असून पुढील काही दिवसांत महानगरपालिकेची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, शहराध्यक्ष व्यंकटेश झिपरे, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष अक्षय चव्हाण, महेश साळुंके व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉक्टरांकडून खंडणी मागणाऱ्या ७ जणांच्या टोळीविरुद्ध गुन्हा दाखल - ३ आरोपी अटकेत.

लातूर :- फिर्यादी डॉ. रमेश तुकाराम भराटे (वय ५२ वर्षे), गायत्री हॉस्पिटल, बार्शी रोड, लातूर यांच्या तक्रारीवरून डॉक्टरांकडून जबरदस्तीने खंडणी मागणे, हॉस्पिटलमध्ये बेकायदेशीर घुसखोरी, स्टाफवर मारहाण, धमक्या देणे, खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न करणे अशा गंभीर प्रकारात ०४ पुरुष व ०३ महिला आरोपींविरुद्ध गु.र.न. ८४०/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १८/११/२०२५ रोजी सायंकाळी फिर्यादी डॉक्टरांच्या हॉस्पिटलमध्ये नर्सिंग स्टाफ ला पगार देण्याचं कारणावरून वादाचे निमित्त करून नमूद आरोपीनी हॉस्पिटल मध्ये जमाव जमवून आरोपींनी गायत्री हॉस्पिटलच्या परिसरात अनधिकृत प्रवेश करून, रुग्णालयातील शांत वातावरणामध्ये भीती निर्माण होत राहील असा गोंधळ व जमाव जमवला. डॉक्टर व नर्स स्टाफला दमदाटी व मारहाण करून डॉक्टर भराटे यांना लक्ष्य करून धमक्या, आरडाओरडा, शिवीगाळ केली.

तसेच रुग्णालयातील नर्सिंग स्टाफला ढकलणे, मारहाण करणे अशा हिंसक कृती केल्या. सदर घटनेमुळे हॉस्पिटलमधील रुग्ण, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. तसेच टायगर ग्रुप चा जिल्हाध्यक्ष आहे असे म्हणणारे आरोपींनी भागवत वैजनाथ मडके याने डॉक्टरांकडून रु. ५०,०००/- खंडणीची मागणी केली.

डॉक्टरांनी दबावाखाली केलेल्या व्यवहारातून आरोपींनी रु. १०,०००/- ची रक्कम ऑनलाइन स्वीकारली, जी पुरावा म्हणून जप्त करण्यात आली आहे.

महिला आरोपींनी डॉक्टरांना विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल करून अडकवण्याची धमकी दिली. दरम्यान गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असताना महिला आरोपी राधिका विराज पाटील उर्फ नगीता विरभद्र खरोसे हिने तक्रारदारांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष धमक्या, दबाव तंत्र निर्माण करत गोंधळ घातला.

महिला पोलिसांनी तिला ठाण्याबाहेर काढण्याचा प्रयत्न केला असता तिने हुज्जतबाजी, आरडाओरडा व अरेरावी केली.

खालील नमूद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम ३३३, ३०८(२), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), ११५, ३५२, ३५१(२) - भारतीय न्याय संहिता (इछ्ड) कलम ५ - महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्य व मालमत्तेची हानी प्रतिबंध) अधिनियम २०१० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून वर उल्लेखित सर्व कलमे अत्यंत गंभीर असून, डॉक्टर व वैद्यकीय संस्थांवरील कोणत्याही प्रकारच्या दडपशाही व हिंसक कृत्याविरुद्ध कडक कारवाईचे प्रावधान यात आहे..

गुन्हा दाखल करण्यात आलेल्या मध्ये

१.भागवत वैजनाथ मडके, रा. चिखली

२.अभिषेक दशरथ गिरी, रा. कोकाटे नगर, लातूर

३.ओम मेगशेट्टे

४.आकाश मोठे

५.पूनम गुंडाळे

६.राधिका विराज पाटील उर्फ नगीता विरभद्र खरोसे

७.काजल जाधव

यांचा समावेश असून एमआयडीसी पोलिसांनी प्रमुख आरोपींपैकी

१.भागवत वैजनाथ मडके,

२.अभिषेक दशरथ गिरी,

३.राधिका पाटील उर्फ नगीता खरोसे

या तिघांना अटक केली आहे. इतर सर्व आरोपींवर पोलिसांचे विशेष पथके शोध मोहीम राबवत आहेत.

आज रोजी तिन्ही अटक आरोपींना मा. न्यायालयात हजर केले असता, मा. न्यायालयाने ०३ दिवसांची पोलीस कोठडी (झउठ) मंजूर केली आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोउनि श्रीकांत मोरे, एमआयडीसी पोलीस स्टेशन, लातूर यांच्याकडे असून ते तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, आर्थिक व्यवहार, डिजिटल पुरावे आणि प्रत्यक्षदर्शी साक्ष यांच्या आधारे करीत आहेत.

नागरिकांना पोलिसांचे आवाहन.

लातूर पोलीस नागरिकांना आवाहन करतात की-

खंडणी, बेकायदेशीर दबाव, डॉक्टर किंवा वैद्यकीय कर्मचाऱ्यांना त्रास देणे, रुग्णालयातील शांतता भंग करणे अशा प्रकारचे कोणतेही कृत्य कुणी करत असल्यास तात्काळ पोलिसांकडे तक्रार नोंदवा. पोलिस विभाग अशा गुन्ह्यांवर कडक व कायदेशीर कारवाई करण्यास कटिबद्ध आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.